RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष २, अंक ८४(२)] गुरुवार, जून ३०, २०१६/आषाढ ९, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १७८

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

महसूल व वन विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २०१६

अधिसूचना

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.

क्रमांक इएनटी.२०१६/प्र.क्र. १०१/टी-१.—महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा. ३१) च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारांनुसार महाराष्ट्र शासन याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ महसूल व वन विभागाच्या अधिनस्थ महसूल कार्यालयांमार्फत नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि द्वितीय अपील प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करण्यात येत आहेत :—

परिशिष्ट

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा (दिवस) | पद निर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम | प्रथम अपील अधिकाऱ्याचे पदनाम | द्वितीय अपील अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील कलम ४(२)(ख) मधील तरतुदींन्वये बहुविध यंत्रणा परिचालक (Multi System Operator) तसेच स्थानिक केबल परिचालक (Local Cable Operator) यांचेकडून परिपूर्ण अर्ज | ३० दिवस | संबंधित जिल्हाधिकारी | संबंधित विभागीय आयुक्त | सचिव/प्रधान सचिव व विशेष कार्य अधिकारी (अपील व रिव्हीजन), |

परिशिष्ट—चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | मिळाल्यानंतर त्यांना करमणुकीच्या स्थानात प्रवेश देण्याबद्दल व शुल्काबद्दल मिळालेल्या रकमांच्या विवरणास अनुसरून देय करमणूक शुल्काची रक्कम शासनाकडे चुकती करण्याची परवानगी देणे. | | | | महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. माधव वीर,**

शासनाचे उप सचिव.